# वृत्त अहवाल

मुंबई
७ मार्च, २०१८

एसएनडीटी महिला विद्यापीठाचा ६७ वा दीक्षान्त समारंभ दिनांक ०७ मार्च २०१८ रोजी दुपारी ११.३० वाजता सर सीताराम तथा लेडी शांताबाई पाटकर दीक्षान्त सभागृह, चर्चगेट येथे साजरा झाला. भारतरत्न महर्षी धोंडो केशव कर्वे यांनी १९१६ साली स्थापन केलेल्या या विद्यापीठाने महिलांसाठी एक दर्जेदार शिक्षण केंद्र निर्माण केले आहे. **शिक्षणातून महिला सक्षमीकरण** हे विद्यापीठाचे ध्येय आहे. **''संस्कृता स्त्री पराशक्ती''** हे बोधवाक्य असलेल्या एसएनडीटी महिला विद्यापीठाने महिला शिक्षण व सक्षमीकरणाचे दैदिप्यमान शतक ओलांडले आहे.

या दीक्षान्त समारंभात विद्यापीठातील १३,८१५ विद्यार्थिनींना पदवी व पदविका प्रदान करण्यात आल्या. त्यामध्ये १०,९३० पदवी, २,३२३ पदव्युत्तर, १४३ पदव्युत्तर–पदविका आणि ३४५ पदविका आणि २२ प्रमाणपत्रांचा समावेश होता. या समारंभात एकूण ५२ पीएच.डी. प्राप्त विद्यार्थिनींना पदवी प्रदान करण्यात आल्या. १९३  दात्यांनी स्थापित केलेली ६७ सुर्वपदके ११९ विद्यार्थीनीना देण्यात आली. यावेळी प्रथमच पीएच.डी. इन वुमेन स्टडीज ही पदवि प्रदान करण्यात आली.

एसएनडीटी महिला विद्यापीठाच्या कुलगुरु प्रा. शशिकला वंजारी यांनी समारंभाचे अध्यक्षस्थान भूषवीले. विद्यापीठाचे प्र–कुलगुरू डॉ. विष्णु मगरे यांनी विद्यापीठाचा दीक्षान्त अहवाल सादर केला आणि कुलगुरूंचा विद्यार्थीनीना संदेश वाचून दाखविला.

डॉ. विजयालक्ष्मी देशमाने, ऑन्कोलॉजीस्ट, व किडवई इन्स्टीटयुट ऑफ ऑन्कोलॉजीच्या माजी प्राध्यापिका आणि विभाग प्रमुख हयांनी प्रमुख अतिथी म्हणून दीक्षांत समारंभाचे अभिभाषण करताना सर्व यशस्वी विद्यार्थीनींचे अभिनंदन केले. भारतीय समाजातील अनेक प्रेरणादायी स्त्रीयांचे स्मरण करतानाच त्यांनी सर्वांना अंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या शुभेच्छा दिल्या. विद्यार्थीनींना संदेश देताना त्यांनी सांगितले की समाजबदल घडविण्यासाठी स्वता:मध्ये बदल घडविणे आवश्यक आहे. त्याकरीता योग्य आहरा बरोबरच त्यांनी स्वामी विवेकानंद, डॉ. कलाम आणि गीतेतील विचारांचे अनुकरण करणे जरूरी आहे.

एसएनडीटी महिला विद्यापीठामध्ये ४१ विद्यापीठ विभाग, ११ संचलित महाविद्यालये आणि संस्था, २ केंद्रे, १७६ संलग्नित महाविद्यालये, १ स्वायत्त महाविद्यालयाचा आणि विद्यापीठ मान्यताप्रात ७ पीएच.डी. रिर्सच संस्थांचा समावेश आहे. एसएनडीटी महिला विद्यापीठाची व्याप्ती ७ राज्ये व १ केंद्रशासित प्रदेशात असून यात ५०,००० विद्यार्थीनींसह ११०० शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी कार्यरत आहेत.

डॉ. सुभाष वाघवारे, संचालक, परिक्षा आणि मुल्यमापन मंडळ यांनी बक्षिसे घोषित केली आणि आभार प्रदर्शन केले.